27 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शास्त्रज्ञ ते कुलगुरुपदाचा डॉ. साळुंखे यांचा प्रवास नव्या पिढीला मार्गदर्शक

## पृथ्वीराज चव्हाण; 'विद्येच्या प्रांगणात' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उत्कृष्ट शास्त्रज्ञ, उत्तम प्रशासक व कुलगुरुपदाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाला व्हीजन देण्याचे काम करणाऱ्या डॉ. माणिकराव साळुंखे यांचे आत्मचरित्र नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल , असे उद्गार माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काढले.

शाहू स्मारक भवनात डॉ. माणिकराव साळुंखे लिखित 'विद्येच्या प्रांगणात' या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. या आत्मचरित्राचे प्रकाशन शाहू महाराज यांच्या हस्ते झाले.



**कोल्हापूर : 'विद्येच्या प्रांगणात' या आत्मचरित्राचे प्रकाशन करताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, शाहू महाराज, डॉ. डी. टी. शिर्के, आ. सतेज पाटील, डॉ. माणिकराव साळुंखे, रणधीर शिंदे आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

शाहू महाराज म्हणाले, आज शिक्षण क्षेत्रातील आमूलाग्र बदल होत असले, तरी डॉ. साळुंखे यांनी यापूर्वीच शिवाजी विद्यापीठात हे बदल करत शिक्षण क्षेत्राचा कायापालट केला आहे. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग भविष्यात शासनाने करून घ्यावा.

आ. सतेज पाटील म्हणाले, नवे शैक्षणिक धोरण हे नव्या पिढीसमोरचे खरे आव्हान आहे. या धोरणाबाबत निर्णायक भूमिका घेण्याची गरज आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, उत्तम प्रशासक आणि विद्यार्थीप्रिय कुलगुरू अशी ख्याती डॉ. माणिकराव साळुंखे यांनी मिळवली. त्यांचे आत्मचरित्र सर्वांना प्रेरणादायी ग्रंथ आहे.

मी मूळचा सांगलीचा असलो, तरी मी कोल्हापूरकर असल्याचा अभिमान आहे, असे डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आपल्या भाषणात सांगितले. कुलगुरू म्हणून काम करताना चांगल्या निर्णयाला येथील कर्मचारी, विविध संघटनांनी पाठबळ दिले. त्यामुळेच चांगले निर्णय घेऊ शकलो.

स्वागत प्रा. रणधीर शिंदे यांनी केले. डॉ. अलोक जत्राटकर यांनी आभार मानले.

2 7 MAY 2023

तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक राज्यात केंद्रीय विद्यापीठाची गरज

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे प्रतिपादन : डॉ. माणिकराव साळुंखे लिखित 'विद्येच्या प्रांगणात' आत्मचरित्राचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील पायाभूत सुविधांबरोबरच विज्ञान, शिक्षण, नवनवीन संशोधन, आरोग्य व सुरक्षेच्या साधनांकडे सरकारने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. यामुळेच देश प्रगतशिल बनू शकतो. बदलत्या काळात वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यासाठी प्रत्येक राज्यात केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री, आमदार पृथ्वीराज चव्हाणं यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या विद्येच्या प्रांगणात आत्मचरित्राचे प्रकाशन श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी ते अध्यक्षस्थानवरून बोलत होते. हे आत्मचरित्र म्हणजे विज्ञान संशोधनास बळ देणारे ठरेल, असेही सांगितले. यावेळी आमदार सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मराठी विभागाचे प्राध्यापक रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शुक्रवारी शाहू स्मारक भवनमध्ये हा प्रकाशन सोहळा झाला.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या विद्येच्या प्रांगणात आत्मचरित्राचे प्रकाशन श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी सोबत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार सतेज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. रणधीर शिंदे.

चंव्हाण म्हणाले, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. अशा परिस्थितीत नवनवीन तंत्रज्ञ विकसित होण्याची गरज आहे. देशात आयआयटी क्षेत्रामध्ये ४१ टक्के पदे रिक्त आहेत. इतर देशाच्या तुलनेत जागतिक दर्जाचे विद्यापीठाची निर्मिती झाली नसल्याची खंत व्यक्त केली. स्पर्धेच्या युगात नवीन तंत्रज्ञानामुळे नोकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रतील गुणवत्ता वाढीसाठी चांगल्या शैक्षणिक विद्यापीठांची निर्मिती होण्याची गरज आहे. श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, डॉ. साळुंखे यांनी अनेक अडचणींवर मात करून शिक्षण घेतले आहे. त्यांनी पाच विद्यापीठांचे कुलगुरू पद भुषविले आहे. तसेच राजस्थानमधील केंद्रीय विद्यापीठातही त्यांनी काम केले आहे. राज्यात काही राजकीय बदल झाले तर त्यांना राज्याचे शिक्षणमंत्रीपद द्या, असा सल्ला त्यांनी चव्हाण यांना दिला. आमदार पाटील म्हणाले, डॉ. साळुंखे यांचे विद्येच्या प्रांगणात हे आत्मचरित्र युवा पिढीला प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल. सध्या समाजात पसरणारे प्रदुषणाचे विचार उत्कृष्ठ लेखणी व गांधी विचाराच्या प्रभावानेच बाजूला होतील. शैक्षणिकदृष्ट्या येणारे नवे धोरण विद्यार्थ्यांसाठी आव्हानात्मक असणार आहे. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, या आत्मचरित्राने शिक्षणातील आठवणींना उजाळा मिळाला आहे. डॉ. साळुंखे यांनी त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठाच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णयावर भर दिल्याचे सांगितले.

डॉ. एम. बी. चव्हाण यांचा सपत्निक विशेष सत्कार करण्यात आला. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. साळुंखे यांनी स्वागत केले. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांनी आभार मानले.

### माझी ओळख कोल्हापूरकर म्हणूनच : डॉ. साळुंखे

माझं मुळ गाव सांगली असले तरी माझी जडणघडण कोल्हापुरात झाली आहे. माझे सर्व शिक्षण कोल्हापुरात झाले. कोल्हापुरात चांगली माणसे भेटली. व माझ्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली. त्यामुळे मी कोल्हापूरचा आयुष्यभर ऋणी राहीन व माझी ओळख ही कोल्हापूरकर म्हणूनच राहील, असे डॉ. साळुंखे यांनी सांगितले.

### मराठीसह इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे

राज्यात अभियांत्रिकेचा अभ्यासक्रम मराठीमध्ये सुरू करण्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. यातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहतील, अशी भीती व्यक्त केली. नवनवीन तंत्रज्ञान व राज्यासह विदेशात शिक्षणसाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे असल्याचे माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी सांगितले.

27 MAY 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण; डॉ. माणिकराव साळुंखे लिखित 'विद्येच्या प्रांगणात'चे प्रकाशन

# बौद्धिक क्षमता विकसित करणारे शिक्षण हवे

कोल्हापूर, ता. २६ : देशात सध्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर विशेष भर दिला जात आहे. मात्र, बौद्धिक क्षमता विकसित करणारे, वैज्ञानिक-संशोधक घडविणारे, आंतरराष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या शिक्षण सुविधा देण्यात आपण मागे पडत आहोत. अशा काळात डॉ. माणिकराव साळुंखे यांनी शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ अनुभवावर आधारित लिहिलेले 'विद्येच्या प्रांगणात' हे आत्मचरित्र शैक्षणिक विकासाची दिशा समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल,' असा विश्वास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी लिहिलेल्या 'विद्येच्या प्रांगणात' या पुस्तकाचे प्रकाशन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी लिहिलेल्या विद्येच्या प्रांगणात या पुस्तकाचे प्रकाशन करताना श्रीमंत शाहू महाराज छत्रपती. शेजारी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, डॉ. साळुंखे, सतेज पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे.**

श्री. चव्हाण म्हणाले, की आंतरराष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यापीठांच्या यादीत पहिल्या १३० मध्ये आपल्याकडील विद्यापीठांचे स्थान नाही. याउलट चीनसारख्या देशाने नऊ विद्यापीठांना स्वायत्तता दिली, निधी दिला व गुणवत्तावाढ करून दाखवली. आंतरराष्ट्रीय स्तरावर तो शैक्षणिक आघाडी घेत आहे. आपल्याकडे अनेक प्राध्यापक, संशोधकांमध्ये गुणवत्ता व अनुभव आहे; पण संधी नाही. अशा अनुभवी व्यक्तींचा शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विशेषतः विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील गुणवत्ता वाढीसाठी प्रभावी उपयोग करून घ्यावा लागेल.

ते म्हणाले, की डॉ. माणिकराव साळुंखे ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून आले. शिक्षण घेत आपली गुणवत्ता सिद्ध केली. देशातील पाच नामांकित विद्यापीठात कुलगुरू किंवा संचालक या पदावर त्यांनी काम केले. अध्यापन, संशोधन, संशोधकांना मार्गदर्शन, प्रशासन अशा विविध स्तरांवर त्यांनी काम केले. आपल्या कार्याचा ठसा उमटवला. त्यांचा अनुभव नव्या पिढीला प्रेरणा देणारा आहे.

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, डॉ. साळुंखे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत कोल्हापूर, नाशिक, राजस्थान, गुजरातमधील विद्यापीठांत मानाच्या पदांवर काम केले. त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव आहे. अशा व्यक्तीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

'शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवाचा उपयोग महाराष्ट्रासाठी करून घ्यावा. सरकार बदलले तर त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान देता येणे शक्य होईल,' असेही ते म्हणाले.

आमदार सतेज पाटील म्हणाले, 'देशात यापूर्वीच्या शैक्षणिक धोरणांमुळे देशाची एकात्मकता टिकून होती. नव्याने येणाऱ्या शैक्षणिक धोरणात सर्वधर्मसमभाव असेल की नाही, या विषयी शंका आहे. अशा काळात शैक्षणिक विचार देणारे डॉ. साळुंखे यांचे पुस्तक नव्या पिढीला उपयुक्त ठरेल.' डॉ. डी. टी. शिर्के यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अलोक जत्राटकर यांनी आभार मानले.

### शैक्षणिक प्रवास...

■ 'विद्येच्या प्रांगणात' या आत्मचरित्रात व्यक्तिगत जीवनप्रवास, कोल्हापुरातील महाविद्यालयीन शिक्षण, त्यानंतर शिवाजी विद्यापीठात कुलगुरूपद, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन कार्य तसेच नाशिकचे मुक्त विद्यापीठ, राजस्थानच्या विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार हाताळताना घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची फलश्रुती, असा शैक्षणिक प्रवास या पुस्तकात असल्याची माहिती डॉ. माणिकराव साळुंखे यांनी दिली.

2 7 MAY 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य आणि निरीक्षक प्रा. एस. बी. देओसकर यांच्यासमवेत शिवाजी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा संसदेमधील 'उत्कृष्ट युवा संसदपटू' बहुमानाचे मानकरी विद्यार्थी.

# आठ विद्यार्थी 'उत्कृष्ट युवा संसदरत्न'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत विद्यापीठातील आठ विद्यार्थ्यांची 'उत्कृष्ट युवा संसदरत्न' म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये पवन पाटील, असिया जमादार, अनमोल पाटील, श्रेया म्हापसेकर, प्रतीक्षा पाटील, सिमरन घाशी, क्रतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

संसदीय कार्य मंत्रालयामार्फत बक्षीस वितरणासाठी समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह विद्यार्थ्यांना नवी दिल्ली येथे निमंत्रित करण्यात येणार असल्याचे केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए.बी. आचार्य यांनी जाहीर केले. राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये स्वच्छ भारत, कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, नवीन शैक्षणिक धोरण, आर्थिक धोरण, संरक्षण इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा झाली. निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस.बी. देओसकर उपस्थित होते. स्पर्धा झाल्यानंतर आचार्य यांनी निकाल जाहीर केला.

27 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देणगीतील पारितोषिकाने गुणवंतांचा सन्मान

डेटा स्टोरी

संतोष मिठारी

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातून शिक्षण घेऊन अनेकांनी यशस्वी करिअर घडविले आहे. अशा माजी विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि समाजातील दानशूर व्यक्ती, संस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी विद्यापीठाला आपल्यापरीने देणगी दिली आहे. त्यातून विद्यापीठ दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सुमारे १२८ गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सन्मान करते. विविध स्वरूपातील शिष्यवृत्तींच्या माध्यमातून ६२६ विद्यार्थ्यांच्या आर्थिक पाठबळ देत शिक्षणाला आधार देत आहे.

विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षान्त समारंभापासून देणगीतून पारितोषिक देणे सुरू झाले. वर्षागणिक देणगीची रकमेबरोबर पारितोषिकांची संख्या वाढली. सध्या २ कोटी १२ लाख रूपयांच्या देणगीवरील व्याजातून पारितोषिके देण्यात येतात. दरवर्षी विविध सहा घटकांतर्गत विद्यापीठ विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्तींद्वारे मदतीचा हात देते. गेल्यावर्षी केंद्रसरकारची शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर, ओबीसी, पोस्ट मॅट्रिक एसबीसी, व्हीजेएनटी शिष्यवृत्तीसाठी १ हजार १११ विद्यार्थी पात्र ठरले. त्यांना ४ कोटी ८६ लाख २ हजार ८९ रुपये इतकी शिष्यवृत्ती मंजूर झाली. मॅट्रिकोत्तर, फ्रीशिप, ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी फ्रीशिप १७३ विद्यार्थ्यांना मिळाली. त्याची रक्कम १ कोटी ८० लाख ४ हजार २४६ इतकी आहे.



**सहा वर्षांतील पारितोषिकांची संख्या**

| वर्ष | पारितोषिकांची संख्या | रक्कम |
|---|---|---|
| २०१७ | १२५ | ३९६७०० |
| २०१८ | १२५ | ३९६५५० |
| २०१९ | १२८ | ४९३१६७ |
| २०२० | १२८ | ४७७६४३ |
| २०२१ | ११४ | ५१७१०० |
| २०२२ | ११७ | ३२९५१३ |

**गोल्डन ज्युबिली रिसर्च स्कॉलरशिप**

| वर्ष | वितरित रक्कम |
|---|---|
| २०१५ | ७५११०३ |
| २०१६ | १०९३६५८ |
| २०१७ | १५३०२२३ |
| २०१८ | ४१११२६९ |
| २०१९ | ३३४०४१० |
| २०२० | ३२३०२४७ |
| २०२१ | २०७४३४१ |
| २०२२ | २५१६०१६ |

> विद्यापीठाकडून गुणवंतांना शिष्यवृत्ती दिली जाते. देणगीच्या माध्यमातून सुरू केलेल्या पारितोषिकांच्या रकमेतूनही विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळते. मात्र, काळाच्या ओघात पैशांचे मूल्य कमी होत चालले आहे. ते पाहता पारितोषिकाची रक्कम कमी वाटते. पण, या पारितोषिकांना मोठी परंपरा आहे. त्यामुळे पारितोषिकांच्या रकमेपेक्षा गुणवंतांचा होणारा सन्मान मोलाचा आहे.
>
> **-डॉ. विलास शिंदे,** प्रभारी कुलसचिव

तरुण भारत



आदित्य साळोखे



प्रतिक जोंग



समेध सासने

# खेलो इंडिया युनिव्हर्सिटी नेमबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला सांघिक सुवर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजधानी दिल्ली येथे सुरु असलेल्या तिसऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारी पदकांचे खाते खोलले आहे. देशातील टॉप–ऐट विद्यापीठातील संघांचा समावेश असलेल्या नेमबाजी स्पर्धेतील सांघिक १० मीटर रायफल या प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

विद्यापीठाच्या संघातून स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल्या कोल्हापुरातील आदित्य साळोखे, समेध सासने व प्रतिक जोंग या तिघांनी सुवर्ण पदकाला गवसणी घालताना तब्बल १८८१.६ गुणांची कमाई केली. यामध्ये प्रतिकच्या ६२७.८, सुमेधच्या ६२७.१ व आदित्यच्या ६२६.७ गुणांचे योगदान राहिले. या तिघांच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग शारीरिक शिक्षण संचालक विजय रोकडे यांनी काम पाहिले. दिल्लीतील अत्याधुनिक अशा डॉ. कर्णिसिंह शुटींग रेंजमध्ये ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत पतियाळा (पंजाब) येथील पंजाब विद्यापीठ संघाने १८७२ गुणांसह रौप्य पदक पटकावले. तसेच मेरठ (उत्तरप्रदेश) येथील चौधरी चरणसिंग विद्यापीठ संघाने १८७० गुणांसह कांस्य पदक मिळवले. स्पर्धेतील पदक प्राप्त संघाला शिवाजी विद्यापीठ कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील व क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी

# विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनास अभिजित शिरगुप्पे यांच्याकडून देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रस्तावित भगवान महावीर अध्यासन इमारतीसाठी जयसिंगपूरच्या अभिजित शिरगुप्पे यांनी ११ हजार रुपयांची देणगी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी त्यांचे अभिनंदन केले. अध्यासन इमारत बांधकामास मदत करावी, असे आवाहन समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

पुढारी

# पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेला ३२ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. शुक्रवारी परीक्षांसाठी ३२ हजार २७५ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून जिल्ह्यातून तीन गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या लेखी परीक्षा सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षाअंतर्गत शुक्रवारी २६ रोजी १२ विभागांच्या लेखी परीक्षा सुरू झाल्या. या परीक्षांसाठी ३२,२७५ विद्यार्थी बसले आहेत. दरम्यान, २५ मेपासून परीक्षांना सुरुवात झाली आहे. या सत्रात ६०० अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील दोन लाख विद्यार्थी प्रविष्ट आहेत. जुलैपर्यंत या परीक्षा सुरू राहणार आहेत. दरम्यान, शुक्रवारी कॉमर्स, आर्ट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बीबीए, बॅचलर ऑफ डिझाईन, शिक्षणशास्त्र, फॅशन डिझायनिंग, बँक मॅनेजमेंट, समाजकार्य शास्त्र, माहिती तंत्रज्ञान, डिफेन्स या विभागातील परीक्षांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून दि. २६ मे, रोजी कोल्हापूर जिल्ह्यातून ३ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली असून, सातारा व सांगली जिल्ह्यांतून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली नाही. तसेच परीक्षेचे गांभीर्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.